शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सन
२०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२
श्री.अभिजीत गुरव...

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२३/प्र.क्र.६५/क्रीयुसे-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांकः २६ ऑगस्ट, २०२३

वाचा-

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.शिछपु-२०२०/प्र.क्र.९३/क्रीयुसे-२, दि.१४ डिसेंबर, २०२२

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.शिछपु-२०२०/प्र.क्र.९३/क्रीयुसे-२, दि.३१ जानेवारी, २०२३

३. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीच्या दिनांक २५/८/२०२३ रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्त

प्रस्तावना -

श्री.अभिजीत गुरव यांनी पॉवरलिफ्टिंग या क्रीडा प्रकाराकरीता सन २०१९-२० या वर्षांकरीता पुरस्कार अर्ज सादर केला होता. श्री.अभिजीत गुरव यांना उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अ-३ मधील नियम क्र.१७ नुसार एकूण १६ गुण प्राप्त होत आहेत व नियम क्र. ६.१ ची देखील पूर्तता करीत आहेत. तथापि, श्री.अभिजीत गुरव हे सन २०१९-२० या वर्षामधील राष्ट्रीय स्पर्धेमध्ये दि.०४/०१/२०१९ रोजी उत्तेजक द्रव्य चाचणीमध्ये दोषी आढळून आल्याने त्यांचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारासाठी विचार करण्यात आला नाही. ॲन्टी डोपिंग अपील पॅनेलने दि.१४/०८/२०२३ रोजीच्या आदेशान्वये श्री.गुरव यांचेवर घालण्यात आलेली बंदी अवैध ठरविली आहे. श्री.गुरव यांनी उपरोक्त आदेशाची प्रत जोडून त्यांच्या नावाचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) करीता विचार करण्यात यावा असे पत्र शासनास सादर केले आहे. त्यानुसार श्री.अभिजीत गुरव यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

श्री.अभिजीत गुरव यांनी सन २०१९-२० या वर्षाच्या पॉवरलिफ्टिंग या क्रीडा प्रकारामध्ये पुरूष खेळाडू संवर्गात पुरस्कारासाठी अर्ज सादर केला होता. सन २०१९-२० या वर्षात अन्य कोणताही पुरूष खेळाडू पुरस्काराकरीता पात्र नसल्याने त्या वर्षात कोणत्याही पुरूष खेळाडूस पुरस्कार जाहीर करण्यात आलेला नाही. शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराचे नियमावलीतील परिशिष्ट-अ मधील नियम क्र.३ (१५) अन्वये "शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार व अन्य

पुरस्कारांबाबतचे सर्व अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील" अशी तरतूद आहे. श्री.अभिजीत गुरव यांना पुरस्कार नियमावली मधील नियम क्र.१७ नुसार एकूण १६ गुण प्राप्त होत आहेत व तसेच ते शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारासाठी इतर आवश्यक निकषदेखील पूर्ण करीत आहेत. त्यामुळे सन २०१९-२० या वर्षाच्या पॉवरलिफ्टींग या क्रीडा प्रकारासाठी श्री.अभिजीत गुरव यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांनी श्री.गुरव यांना सदर पुरस्काराने सन्मानित करण्यासाठीची आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज्ञानेश्वर आव्हाड)

कार्यासन अधिकारीमहाराष्ट्र शासन ,

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

२) मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे खाजगी सचिव

३) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,

४) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक,

५) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,

६) विभागीय उपसंचालक, मुंबई विभाग,

७) जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे,

८) श्री.अभिजीत गुरव (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत),

९) निवडनस्ती क्रीयुसे-२